# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in website: www.dtemaharashtra.gov.in


कालमर्यादित/ ईमेलव्दारे
दि. ३१.१०.२०१७

जा.क्र : १०/एनजीपी/एनबीए मुल्यांकन/२०१७/४०५१
दिनांक : 26 OCT 2017

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/पुणे.

विषय:- शासकीय/अशासकीय अनुदानित व कायम विनाअनुदानित पदविका अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र/एचएमसीटी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांचे एनबीएकडुन मानांकन करुन घेणेबाबत.......

संदर्भ- १) या संचालनालयाचे पत्र क्र. १०/एनजीपी/एनबीए नामांकन/२०१६/१३६०/१३६० दि. ३.१०.२०१६

२) शासनाचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्र. केआरए-२०१६/(प्र.क्र.२३८/१६) /तांशि-५, दि. १९.०९.२०१७

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, राज्यातील आपले विभागातंर्गत कार्यरत शासकीय / अशासकीय अनुदानित व कायम विनाअनुदानित पदविका अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र /एचएमसीटी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांचे एनबीए कडुन मानांकन प्राप्त करुन घेण्याचे अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करणेबाबत संचालनालयाच्या संदर्भिय क्र. १ च्या पत्रान्वये आपणांस कळविण्यात आलेले होते. तसेच मानाकनांची कार्यवाही करण्यासाठी संस्थाना आवश्यक त्या माहितीसाठीचे मार्गदर्शन करण्यासाठी विभागांतर्गत दोन ते तीन शिबीर/कार्यशाळा आयोजित करुन संस्थाना प्रोत्साहित करण्याबाबत सदर पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यासाठी मानांकनाचे प्रक्रीया शुल्क भरण्यासाठी संस्थेचे विकास निधी मधुन खर्च करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. तसेच सदर पत्रान्वये असे ही कळविण्यात आलेले आहे की, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे दि. ३१ मार्च २०१६ चे शासन निर्णयान्वये व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना शै. वर्ष २०१५-१६ पासुन पुढे सुरु ठेवण्यास मान्यता देताना संस्थांनी संबधित शिखर संस्थाकडुन मूल्यांकन व दर्जा निश्चिती करुन शै. वर्ष २०१८-१९ पर्यत मूल्यांकन प्राप्त न केल्यास अशा संस्थांना शै. वर्ष २०१९-२० पासुन मुल्यांकन व दर्जा प्राप्त होईपर्यत या योजनेतून वगळण्यात येईल व त्या वर्षापासुन केवळ मानांकन प्राप्त करणा-या शैक्षणिक संस्थेमध्ये प्रथम वर्षासाठी प्रवेश घेणा-या विद्यार्थ्याकरीता सदर योजना लागू राहील असे नमुद करण्यात आले असल्याने सदर बाब आपले विभागातंर्गत सर्व संस्थांच्या निदर्शनास आणुन मानांकनासाठी आवश्यक कार्यवाही लवकरात लवकर करण्याबाबत सदर पत्रात नमुद करण्यात आलेले आहे.

शासनाचे उपरोक्त संदर्भिय क्र. २ च्या पत्रान्वये असे कळविलेले आहे की, सद्यस्थितीत राज्यातील कार्यरत ४४ शासकीय तंत्रनिकेतनातील शिक्षकीय पदांची स्थिती ब-यापैकी सुधारली आहे. त्यामुळे तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई यांचे अंतर्गत असलेल्या सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित पदविका संस्थांचे National Board of Accreditation, New Delhi यांचे व्दारे मानांकन प्राप्त करुन घेण्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही तातडीने करुन केलेल्या कार्यवाही बाबतचा अहवाल शासनास सादर करण्याच्या सुचनां शासनाचे उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये संचालनालयास देण्यात आलेल्या आहेत.

तरी शासनपत्राचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपले विभागातंर्गत असलेल्या सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित संस्थापैंकी किती संस्थानी त्यांचे संस्थेत सुरु असलेल्या पदविका अभ्यासक्रमाचे National Board of Accreditation, New Delhi यांचे व्दारे मानांकन प्राप्त करुन घेतले आहे, मानांकन प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे, या बाबतची सद्यस्थिती सोबत जोडण्यात आलेल्या प्रपत्रामध्ये Sakal Marathi या फॉन्टमध्ये एकत्रित संकलित करुन Soft व Hard copy दि. ३१.१०.२०१७ पर्यत desk10@dtemaharashtra.gov.in या Email वर उपलब्ध करुन देण्यात यावी.

मीता राजीवलोचन

(मीता राजीवलोचन) भाप्रसे
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई

सोबत- प्रपत्र

पृष्ठांकन क्र.विकाऔ/शिक्षण/२०१७/३८४०
दिनांक :- ३१/१०/२०१७

या कार्यालयाच्या अधिनस्त येत असलेल्या शासकीय/अशासकीय अनुदानित व कायम विनाअनुदानित पदविका अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/एचएमसीटी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था प्रमुख यांना सुचित करण्यात येते की, आपल्या संस्थेचे एनबीएकडून मानांकन करून घेणेबाबत उपरोक्त पत्रात नमुद केल्यानुसार सोबत जोडलेल्या पपत्रात माहिती भरून या कार्यालयास दिनांक ३१/१०/२०१७ पर्यंत Soft व hard copy मध्ये सादर करण्यात यावी.

सोबत :- १. संचालनालयाचे संदर्भिय पत्र.

प्र.सहसंचालक, ३०/१०
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना प्रत देण्यात येवून सुचित करण्यात येते की, सदरील पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

# प्रपत्र

विभागीय कार्यालयाचे नांव :

| अनु. क्र. | संस्थेचे नांव | शासकीय/अशासकीय अनुदानित | संस्थेत सुरु असलेल्या पदविका अभ्यासक्रमाचे नाव | एनबीए मानांकन प्राप्त झालेल्या पदविका | | अभ्यासक्रम Pre-qualifier नुसार पात्र आहे का? (होय/नाही) | एनबीए मानांकन प्राप्त झाले नसल्यास एनबीए साठी अर्ज केला त्याबाबतची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अभ्यासक्रमाचे नांव | मानांकन प्राप्त झाल्याचा दिनांक व कालावधी | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

टिप- अभ्यासक्रम Pre-qualifier नुसार पात्र नसल्यास त्याचे स्पष्टीकरण नमुद करण्यात यावे.

सही व पदनाम